| MHRG170015872024 | | दाखल दिनांक | : | ०२/०८/२०२४ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नोंदणी दिनांक | : | ०२/०८/२०२४ | | |
| | | निकाल दिनांक | : | ०१/०४/२०२६ | | |
| | | कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | | | ०१ | ०७ | ३० |

**भाग – अ**

**(न्यायनिर्णयाचे पुष्ठ पान)**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (I) अन्वये )

**अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पनवेल–रायगड यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – एस. आर. चव्हाण)**

**न्यायनिर्णय घोषित दिनांक ०१/०४/२०२६**

**सत्र खटला क्रमांक ७८/२०२४**

**निशाणी क्र. ७८/अ**

गुन्हा भारतीय दंड विधान कलम ३५३ सह कलम ३४ अन्वये.

गुन्हा नोंद क्रमांक २८९/२०२३ पनवेल शहर पोलीस ठाणे.

| | |
|---|---|
| फिर्यादी /तक्रारदार | महाराष्ट्र शासन पनवेल शहर पोलीस ठाणे. |
| अभियोग पक्ष | सरकारी अभियोक्ता श्री.राजेंद्र येरुणकर |
| आरोपी | १. प्रतिक दत्तात्रय जाधव<br>वय – २९ वर्षे, व्यवसाय – नोकरी<br>२. सुवर्णा दत्तात्रय जाधव<br>वय– ४७ वर्षे, व्यवसाय – गृहिणी<br>दोघेही रा. रुम नं. २०४, निलकंठ सुर्योदय,<br>सेक्टर २ए, प्लॉट नं.१८, करंजाडे,<br>ता. पनवेल, जि. रायगड. |

| | | |
|---|---|---|
| आरोपीतर्फे विधिज्ञ | | विधीज्ञ श्री. अंकित बंगेरा |

**भाग –ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये )

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | – | ३०/०४/२०२३ |
| फिर्याद दाखल दिनांक | – | ३०/०४/२०२३ |
| दोषारोप पत्र पाठविल्याचा दिनांक | – | १९/०७/२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | – | ०९/१०/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | – | ०४/१२/२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | – | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | – | ०१/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | – | –– |

**<u>आरोपीची माहिती</u>**

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रतिक दत्तात्रय जाधव | दि.२०/६/२३ रोजीच्या आदेशानुसार आरोपी अटकपूर्व जामीनावर | दि.२०/६/२३ रोजीच्या आदेशानुसार आरोपी अटकपूर्व जामीनावर | भा.द.वि. कलम ३५३, ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | सुवर्णा दत्तात्रय जाधव | दि.२०/६/२३ रोजीच्या आदेशानुसार आरोपी अटकपूर्व जामीनावर | दि.२०/६/२३ रोजीच्या आदेशानुसार आरोपी अटकपूर्व जामीनावर | भा.द.वि. कलम ३५३, ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | – | – |

## भाग – क

## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये )

## सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | प्रकाश लोटण पाटील | साक्षीदार | १६ |
| २. | सुरज सुकलाल बावीस्कर | फिर्यादी | १९ |
| ३. | संदीप रमाकांत देशपांडे | पंच साक्षीदार | २८ |
| ४. | हनुमंत घनश्याम अहिरे | साक्षीदार | ३६ |
| ५. | प्रमोद दिनकर पवार | साक्षीदार | ३९ |
| ६. | रविंद्र पारस राजभर | साक्षीदार | ५१ |
| ७. | सुनील शिवगीर गिरी | दाखल अंमलदार व तपासी अधिकारी | ६० |
| ८. | सुरेश किसन खरात | तपासी अधिकारी | ६९ |

## ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास :–

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक. | निरंक. |

## क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास :–

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक. | निरंक. |

## अभियोग पक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाण्यांची यादी

### अ. अभियोग पक्ष

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | नि.पी. २०/सा.क्र.२ | फिर्याद |
| २. | नि.पी.२१/सा.क्र.२ | एफ.आय.आर. |
| ३. | नि.पी.२२/सा.क्र.२ | जप्ती पंचनामा |
| ४. | नि.पी. २३/सा.क्र.२ | भारतीय पुरावा कायदा कलम ६५–ब चे प्रमाणपत्र |
| ५. | नि.पी. २९/सा.क्र.३ | घटनास्थळ पंचनाम्यावरील साक्षीदाराची सही |
| ६. | नि.पी.६१/सा.क्र.७ | घटनास्थळ पंचनामा |
| ७. | नि.पी. ७०/सा.क्र.८ | मुद्देमाल पावती |
| ८. | नि.पी. ७१/सा.क्र.८ | दिनांक ०९/०५/२०२३ रोजी जनरल डयुटी अंमलदार पनवेल शहर पोलीस ठाणे यांना दिलेले पत्र |
| ९. | नि.पी. ७२/सा.क्र.८ | डयुटी बटवडा |
| १०. | नि.पी. ७३/सा.क्र.८ | दिनांक १०/०५/२०२३ रोजी सहा. पोलीस |

| | | |
|---|---|---|
| | | आयुक्त बीनतारी संदेश विभाग यांना पाठविलेले पत्र. |
| ११. | नि.पी. ७४/सा.क्र.८ | बीनतारी संदेशाच्या माहितीची सत्यप्रत |

**ब. बचाव पक्ष :-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | स्वरूप |
|---|---|---|
| | निरंक. | निरंक. |

**क. न्यायालय निशाणी –**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | ८ | दोषारोप |
| २ | ७६ | आरोपी क्र.१ चे फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणे निवेदन |
| ३ | ७७ | आरोपी क्र. २ चे फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणे निवेदन |

**ड. भौतिक वस्तू –**

| अ.क्र. | मुद्देमाल आर्टिकल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | एम.ओ.नं.१ | पेनड्राईव्ह |

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक ०१/०४/२०२६)

**०१.** आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३५३ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवून प्रस्तुत खटला चालविण्यात आला आहे.

०२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकिकत अशी आहे की, फिर्यादी सुरज सुकलाल बाविस्कर हे दिनांक २१/११/२०२२ पासून पनवेल शहर पोलीस स्टेशन येथे पोलीस शिपाई या पदावर कार्यरत आहेत. दिनांक ३०/०४/२०२३ रोजी सकाळी ९.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत त्यांना पिटर मोबाईल वाहन क्र.एमएच.४६/बीई.६५६४ यावरील वायरलेस सेटवर आरटीपीसी कर्तव्यास नेमलेले होते. सदर वाहनावर पोलीस शिपाई प्रकाश पाटील हे चालक म्हणून होते. पोलीस ठाण्यातील वरिष्ठ अधिकारी गस्तीकरिता रवाना होतील असे सदर फिर्यादी यांना पोलीस नियंत्रण कक्ष, नवी मुंबई यांनी वायरलेसने कळविले. सदर माहिती फिर्यादी यांनी पोलीस निरिक्षक गुन्हे श्री. प्रमोद पवार यांना सांगितली. त्यानंतर पोलीस नियंत्रण कक्षास कॉल देवून पीटर मोबाईल या वाहनाने सदर फिर्यादी, पोलीस निरिक्षक श्री. पवार असे गस्तीकरिता सायंकाळी ६.१५ वाजता रवाना झाले. त्यानंतर याकूब बेग हायस्कूल येथे भेट दिली. तेथे निवडणूक निकाल प्रक्रिया चालू होती. त्यानंतर उरण नाका, करंजाडे असे जात असताना सायंकाळी ६.२५ वाजता दुधे बिल्डींगच्या समोर करंजाडेकडे जाणा–या मुख्य रस्त्याच्या ठिकाणी फिर्यादी यांचे पथक गस्तीकरिता पोहचले. त्यावेळी रस्त्याच्या कडेला वाईन शॉपसमोर टेबल मांडून चार इसम वाफवलेले मक्याचे दाणे, शेंगदाणे, फुटाणे, चणे व चकली असे खाद्य पदाथ विक्री करत होते. सदर ठिकाणी कॉर्नर असल्याने सदर खाद्य पदार्थ विक्रीमुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होत होता. दुधे बिल्डींगच्या मालकाने त्याबाबत तक्रार अर्ज केले असल्याचे पोलीस निरिक्षक गुन्हे, पवार यांनी सांगितले होते. त्या इसमांना पोलीस निरिक्षक पवार यांनी त्यांचे टेबल उचलून घेणेस सांगितले. परंतु, ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्या चार इसमांपैकी दोन इसमांना पुढील कारवाईकरिता पवार साहेबांनी पिटर मोबाईल या वाहनामध्ये बसवून सदर पिटर मोबाईल व्हॅन हे करंजाडे चौकी येथे घेवून आले. करंजाडे बीट चौकी येथे पोहचताच एका कार मधून दोन महिला व तीन इसम हे पोलीसांच्या गाडीच्या जवळ गाडी थांबवून एक महिला व एक दाढीवाला टीळा

लावलेला इसम यांनी पोलीसांची गाडी अडवून ''आम्ही पोलीसांचे कुटुंब असून आम्हाला पोलीसच धंदा करु देत नाही'' असे जोरजोरात आरडाओरड करु लागले. दाढीवाल्या इसमाने जोरात पोलीस गाडीचे बोनेटवर हात आपटून आरडाओरड करुन तुम्ही कारवाई कसे करता ते बघतोच. तसेच महिला ही पोलीसांच्या अंगावर धाऊन ''करा माझेवर कारवाई'' असे बोलत होती. दाढीवाला इसम जोरजोरात मांडी ठोकून ''दम असेल तर या पुढे'' असे जोरात ओरडत होता व पोलीसांच्या अंगावर धाऊन जात होता. गाडीतून उतरलेले इतर दोन इसम व एक महिला हे बाजूला उभे राहून बघत होते. सदर महिला व दाढीवाला इसमास पोलीस हवालदार अहिरे व पोलीस शिपाई मोकल यांनी समजाविणेचा प्रयत्न केला. परंतु, ते काहीएक ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. कारवाईकरिता आणलेले दोन इसम गाडीतून उतरुन निघून गेले. त्यानंतर पोलीस निरिक्षक पवार यांनी पोलीस ठाण्यातून महिला व इतर अंमलदार यांची मदत मागितली. त्यानुसार काही वेळात ११२ मोबाईलवर कर्तव्यावर असणारे पोलीस उपनिरिक्षक जगदाळे, तसेच पोलीस ठाणे अंमलदार पोलीस उपनिरिक्षक गिरी, महिला पोलीस शिपाई गोलावार व पथक सदर ठिकाणी पोहचले. दाढीवाले इसमाचे नाव प्रतिक जाधव व महिला ही त्याची आई असून तिचे नाव सौ. जाधव असल्याचे समजले. सदर घटनेचे व्हीडीओ शुटींग फिर्यादीने त्याच्या मोबाईलमध्ये घेतले होते. घटनेबाबत फिर्यादीने फिर्याद दाखल केली. सदर फिर्यादीवरुन पनवेल शहर पोलीसांनी सदर आरोपींविरुध्द गुन्हा रजिस्टर क्रमांक २८९/२०२३ भा.द.वि. कलम ३५३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा दाखल केला.

**०३.** सदर गुन्हयाचा सुरुवातीचा तपास पोलीस उपनिरिक्षक सुनील गिरी यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी दोन पंचांना बोलावून घटनास्थळ पंचनामा केला. त्यानंतरचा तपास हा सहा. पोलीस उपनिरिक्षक सुरेश खरात यांनी केला. घटनेचे शुटींग फिर्यादी सुरज बावीस्कर यांनी मोबाईलमध्ये केले होते. ते शुटींग तपासी अधिकारी यांनी लॅपटॉपमार्फत पेनड्राईव्हमध्ये दोन

पंचांसमक्ष घेतले. तसा पंचनामा तयार केला. फिर्यादी याने भारतीय पुरावा कायदा कलम ६५–ब नुसार प्रमाणपत्र दिले. दिनांक ३०/०४/२०२३ रोजीचे डयुटी बटवडयाची प्रत जनरल डयुटी अंमलदार शहर पोलीस स्टेशन यांचेकडून प्राप्त करुन घेतली. वायरलेस कॉल लॉगची माहिती मिळणेकरिता सहा. पोलीस आयुक्त बिनतारी संदेश विभाग यांना दिनांक १०/०५/२०२३ रोजी पत्र पाठविले. साक्षीदारांचे तपासटिपणे नोंदविली. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपी यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना त्यांचे शासकीय कर्तव्य बजावत असताना अडथळा आणल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपींविरुध्द प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पनवेल यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. प्रस्तुत खटला चालवून निकाली करण्याचा अधिकार सत्र न्यायालय यांच्याकडे असल्याने, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०७ ची पूर्तता करुन कलम २०९ अन्वये प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पनवेल यांनी सदर खटला या न्यायालयात वर्ग केला आहे.

**०४.** उभयपक्षांचा युक्तिवाद व सरकारपक्षातर्फे दाखल कागदपत्रांचा विचार करुन मी आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३५३ सह कलम ३४ अन्वये गुन्हयाचा दोषारोप नि.क्र.८ वर निश्चित केला. आरोपींनी गुन्हा अमान्य करुन संपरिक्षा घेण्याची विनंती केली.

**०५.** अभियोग पक्षाने एकूण आठ साक्षीदार तपासले आहेत. आरोपींविरुध्द दाखल पुरावा त्यांना समजावून त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निशाणी ७६ व ७७ कडे निवेदन नोंदविण्यात आले. आरोपींनी कोणताही गुन्हा केला नसल्याचा त्यांचा बचाव आहे व अभियोग पक्षाची सर्व कथने आरोपींनी नाकारली आहेत.

**०६.** अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.राजेंद्र येरुणकर व आरोपींचे विधिज्ञ श्री. अंकित बंगेरा यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणातील दोषारोप, अभिलेखावर उपलब्ध असलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा यांचे अवलोकन

करुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निर्माण झाले असून त्यावरील निष्कर्ष कारणासह मी खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, आरोपी क्र.१ व २ यांनी संगनमताने दिनांक ३०/०४/२०२३ रोजी, १८.४० वाजता, करंजाडे बीट चौकी, ता. पनवेल, जि.रायगड येथे फिर्यादी व साक्षीदार हे लोकसेवक म्हणून त्यांचे शासकीय कर्तव्य पार पाडत त्यांना प्रतिबंध करण्याच्या किंवा धाकाने परावृत्त करण्याच्या उद्देशाने प्रस्तुत आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांचेवर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करुन भा.दं.वि. कलम ३५३ सह कलम ३४ खालील अपराध केला आहे ? | .... नाही |
| २. | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**०७.** आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने एकूण आठ साक्षीदार तपासले असून पुरावा बंद पुरसीस नि.७५ कडे देऊन पुरावा बंद केलेला आहे.

**०८.** अभियोग पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील श्री.राजेंद्र येरुणकर यांनी असा युक्तीवाद केला की, फिर्यादी व साक्षीदार हे त्यांचे शासकीय कर्तव्य पार पाडत असताना आरोपी यांनी त्यांना अडथळा केला. अभिलेखावर

असलेला उपलब्ध पुरावा हा सुसंगत असून अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द संशयापलिकडे गुन्हा सिध्द केलेला आहे.

०९. आरोपींचे वकिल श्री. अंकित बंगेरा यांनी असा युक्तिवाद केला की, आरोपींनी कोणताही गुन्हा केलेला नाही. दुधे बिल्डींगच्या मालकाच्या सांगणेवरुन खोटी फिर्याद आरोपींविरुध्द दाखल केली आहे. फिर्यादी यांनी सादर केलेले घटनेचे व्हीडीओ यामध्ये छेडछाड झालेली असून सदर व्हीडीओ शुटींग हे अभियोगपक्षाने कायदयाप्रमाणे सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे ते आरोपींविरुध्द वापरता येत नाही. सर्व साक्षीदारांची साक्ष ही मोघम स्वरुपाची आहे. गाडीतून पळून गेलेल्या व्यक्तीची नावे सांगितलेली नाहीत. तसेच, आरोपी ज्या गाडीतून आले त्याची माहिती अभिलेखावर आणलेली नाही. अभियोगपक्षाने संशयापलिकडे केस सिध्द केलेली नाही. आरोपी हे निर्दोष मुक्ततेस पात्र आहेत.

**<u>मुद्दा क्रमांक १ व २</u> –**

१०. भारतीय दंड विधान कलम ३५३ खाली गुन्हा सिध्द करणेकरिता, घटनेवेळीस फिर्यादी व साक्षीदार हे लोकसेवक म्हणून कार्यरत होते. ते त्यांचे शासकीय कर्तव्य पार पाडत असताना आरोपी यांनी त्यांना प्रतिबंध करण्याच्या किंवा धाकाने परावृत्त करण्याच्या उद्देशाने फिर्यादी व साक्षीदार यांचेवर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग केला असे अभियोगपक्षाने सिध्द करणे गरजेचे आहे.

११. साक्षीदार क्र.१ प्रकाश पाटील यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, ते पनवेल शहर पोलीस स्टेशन येथे नोव्हेंबर २०२२ पासून नेमणूकीस आहेत. त्यांना दिनांक ३०/०४/२०२३ रोजी सकाळी ९.०० ते रात्री ९.०० पर्यंत पिटर मोबाईल वाहन क्र.एमएच.४६.बीई.६५६४ यावर चालक म्हणून नेमणेत आले होते. ते, पोलीस शिपाई सुरज बावीस्कर, पोलीस निरिक्षक प्रमोद पवार असे सायंकाळी ६.१५ वाजताचे सुमारास पिटर मोबाईल वाहनासमोर गस्तीकरिता रवाना झाले. त्यांनी प्रथम याकूब बेग हायस्कूल येथे चालू

असलेल्या निवडणूक निकाल प्रक्रियेला भेट दिली. त्यानंतर उरण नाका मार्गे करंजाडे येथे जात असताना दुधे बिल्डींगच्या कॉर्नरपासून मुख्य रस्त्यावर जात असताना तेथे वाईन शॉपच्या समोर एक टेबल मांडलेला होता. त्या टेबलावर चार इसम वाफवलेले मक्याचे दाणे, चणे, फुटाणे, शेंगदाणे व चकली असे खाद्य प्रदार्थ विक्री करत होते. त्यावेळी फिर्यादी यांच्या पथकाने गाडी थांबवून त्या चार इसमांना सांगितले की, कॉर्नर असल्याने वाहतूकीस अडथळा होत आहे. परंतु, त्या लोकांनी न ऐकल्यासारखे केले. त्या चारपैकी दोन इसमांना फिर्यादी यांच्या पथकाने गाडीत बसवून कारवाई करणेकरिता करंजाडे चौकीत पोहचताच त्याठिकाणी त्यांच्या गाडीसमोर एक गाडी येवून थांबली. त्या गाडीमधून तीन पुरुष व दोन महिला खाली उतरले. त्यापैकी एक महिला व तसेच एक दाढीवाला व कपाळाला टिळा लावलेला इसम गाडीच्या समोर आला. त्याने असे सांगितले की, ''आम्ही पोलीसांचे कुटुंब असून पोलीस आमच्यावर कसे कारवाई करतात ते आम्ही बघतो''. त्या दाढीवाल्या इसमाने गाडीच्या बोनेटवर हात आपटून जोरजोरात आरडाओरड केली. महिला ही पोलीसांच्या अंगावर येवून आमच्यावर कारवाई कसे करता ते मी बघते असे सांगितले. तसेच दाढीवाला इसमाने मांडी थोपटून आमच्यावर कसे कारवाई करता ते बघतो असे सांगितले. पोलीस हवालदार अहिरे व पोलीस शिपाई मोकल हे करंजाडे पोलीस चौकीतून बाहेर आले. त्यांनी त्या इसमास व महिलेस समजाविणेचा प्रयत्न केला. परंतु, ते ऐकण्याच्या मनस्थितीमध्ये नव्हते. कारवाईकरिता आणलेले दोन इसम गाडीतून खाली उतरुन निघून गेले. चौकशीमध्ये त्या दाढीवाला इसमाचे नाव प्रतिक जाधव व महिलेचे नाव सौ. जाधव असल्याचे समजले. पवार साहेबांनी गाडीत असलेल्या वायरलेस सेटवरुन बेलापूर नियंत्रण कक्षास कॉल करुन मदत पाठविणेस सांगितले. त्यानुसार ११२ वाहनावरील पीएसआय गिरी, महिला पोलीस शिपाई गोलावार असे तीन पोलीस कर्मचारी करंजाडे पोलीस चौकीत आले. त्यांच्या मदतीने आरोपी यांना पनवेल शहर पोलीस स्टेशन येथे घेवून गेले. घटनेचे व्हीडीओ शुटींग पोलीस शिपाई बावीस्कर यांनी त्यांच्या

मोबाईलमध्ये केले.

**१२.** साक्षीदार क्र.२ सुरज बावीस्कर व साक्षीदार क्र.५ प्रमोद पवार यांनी देखील साक्षीदार क्र.१ यांचेप्रमाणे साक्ष दिली आहे. घटनास्थळ पंच साक्षीदार संदीप देशपांडे सा.क्र.६ यांनी अभियोगपक्षास मदत केली नाही.

**१३.** साक्षीदार क्र.४ हनुमंत अहिरे यांच्या साक्षीत असे आले आहे की, दिनांक ३०/०४/२०२३ रोजी त्यांना करंजाडे येथे बीट मार्शल ५ ची डयुटी देणेत आली होती. त्यांच्यासोबत पोलीस शिपाई मोकल हे होते. सायंकाळी ६.४० वाजता चौकीच्या बाहेर गोंगाट ऐकू आला म्हणून ते व पोलीस शिपाई मोकल चौकीतून बाहेर आले. त्यावेळी पिटर मोबाईल व्हॅनजवळ पोलीस शिपाई बावीस्कर, पोलीस शिपाई प्रकाश पाटील व प्रमोद पवार यांना एक दाढीवाला इसम व एक महिला यांनी त्यांना शिवीगाळ केली व आरडाओरड करुन त्यांचे अंगावर धावून जात होता. दाढीवाला इसम हा बोनेटवर हात मारुन माझे कारवाई करा असे म्हणत होता. दाढीवाला इसम मांडी थोपटून पोलीसांना दम असेल तर येवून दाखवा असे म्हणत होता. कारवाईसाठी आणलेले इसम गाडीतून उतरुन जमावामध्ये जमा झाले.

**१४.** साक्षीदार क्र.२ यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, घटनेदिवशी आरटीपीसी म्हणून महिला पोलीस शिपाई भोईर यांची नेमणूक होती. घटनेदिवशी कर्तव्य तक्त्यावर भोईर मॅडमची आरटीपीसी म्हणून नोंद होती. कर्तव्य तक्त्यावर आरटीपीसी म्हणून सदर साक्षीदाराची नोंद नाही. सदर साक्षीदाराला दुधे बिल्डींग, याकूब बेग व करंजाडे पोलीस चौकी येथे जाणेबाबत लेखी आदेश मिळालेले नव्हते. दुधे कॉर्नर, याकूब बेग व करंजाडे चौकी यांना भेट देणेची सदर साक्षीदारांना डयुटी देणेत आलेली नव्हती. तसेच साक्षीदार क्र.४ यांनी उलटतपासात मान्य केले आहे की दिनांक ३०/०४/२०२३ रोजी ४.०० वाजता पासून ते २१.०० वाजेपर्यंत त्यांना चिंचपाडा येथे फिक्स पाईंट डयुटी दिलेली होती. यावरुन असे दिसून येते की, सदर साक्षीदार क्र. २ व ४

यांना घटनेदिवशी घटनास्थळी कर्तव्य देणेत आलेले नव्हते.

**१५.** अभियोगपक्षाने रविंद्र राजभर यांना साक्षीदार क्र.६ म्हणून तपासले आहे. त्यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, करंजाडे पोलीस चौकीच्या समोर ते फुल विक्रीचा व्यवसाय करतात. दिनांक ३०/०४/२०२३ रोजी सायंकाळी ६.४५ वाजताचे दरम्यान एक महिला व एक पुरुष असे दोन व्यक्ती पोलीस चौकीमध्ये आले. त्यांनी पोलीसांशी भांडण केले. त्यानंतर पोलीसांची दुसरी गाडी आली. त्यामध्ये दोन पोलीस होते. पोलीस गाडीमधून उतरल्यावर ती महिला व त्या पुरुषाने पोलीसांशी भांडण केले. तो पुरुष मांडी थोपटून पोलीसांना दम देत होता. तसेच महिला देखील पोलीसांना बोलत होती. सदर साक्षीदाराची साक्ष ही साक्षीदार क्र.१, २, ४ व ५ यांच्या साक्षीशी सुसंगत नाही. सदर साक्षीदार क्र.६ यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, एक महिला व एक पुरुषाने पोलीसांची दुसरी गाडी आल्यावर भांडण केले. परंतु, तसे इतर साक्षीदारांच्या साक्षीत आले नाही. सदर साक्षीदाराने आरोपी यांना ओळखू शकत नसल्याचे सांगितले.

**१६.** तपासी अंमलदार साक्षीदार क्र.८ सुरेश खरात यांनी तपासादरम्यान दिनांक ३०/०४/२०२३ रोजीच्या डयुटी बटवडयाची प्रत जनरल डयुटी अंमलदार, पनवेल शहर पोलीस स्टेशन यांच्याकडून प्राप्त केली आहे. सदर डयुटी बटवडयाची प्रत नि.पी.७२/सा.क्र.८ येथे आहे. त्यावर पिटर मोबाईलवर दिनांक ३०/०४/२०२३ रोजी पोलीस शिपाई पाटील व बावीस्कर यांची डयुटी असल्याचे नमूद आहे. सदर डयुटी बटवडा हा साक्षीदार क्र.८ यांनी प्रमाणित केल्याचे दिसून येत आहे. परंतु, त्यांनी उलटतपासात असे मान्य केले आहे की, डयुटी बटवडा हा त्यांच्या नियंत्रणाखाली नव्हता. डयुटी बटवडा जनरल डयुटी अंमलदार यांच्याकडून मागून घेतला होता. त्यांनी तो प्रमाणित करुन दिलेला नाही. तसेच डयुटी बटवडयासोबत डयुटी बटवडा अंमलदाराने लेखी अहवाल दिलेला नाही. सदर डयुटी बटवडा हा डयुटी बटवडा अंमलदार

यांनी प्रमाणित करुन दिलेला नाही. सदर डयुटी बटवडयाची प्रत ही मुळ डयुटी बटवडयाची असल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केलेले नाही. त्यामुळे साक्षीदार क्र.१, २ व ५ यांना घटनेदिवशी घटनास्थळी लोकसेवक म्हणून डयुटी देणेत आल्याचे अभियोगपक्षाने शाबीत केलेले नाही.

**१७.** साक्षीदार क्र.२ यांनी असे कथन केले आहे की, त्यांनी घटनेचे व्हीडीओ हे त्यांच्या मोबाईलमधून घेतले होते. सदर शुटींग हे चार व्हीडीओमध्ये केलेले होते. ते दिनांक १०/०५/२०२३ रोजी सदर साक्षीदाराच्या मोबाईलमधून लॅपटॉपच्या मदतीने तपासी अंमलदार खरात सा.क्र.८ यांनी पेनड्राईव्हमध्ये घेतले होते. सदर पेनड्राईव्ह हा एम.ओ.नं.१ अभियोगपक्षाने दाखल केला आहे. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये असे मान्य केले की, दिनांक १०/०५/२०२३ पर्यंत तो मोबाईल त्याच्या ताब्यामध्ये होता. घटना ही दिनांक ३०/०४/२०२३ रोजीची आहे. परंतु, सदर साक्षीदाराने घटना घडल्यापासून तो मोबाईल दिनांक १०/०५/२०२३ पर्यंत स्वतःच्या ताब्यात ठेवलेला होता. व्हीडीओ शुटींग केल्यानंतर तात्काळ तपासी अंमलदार यांचेकडे का जमा केला नाही याचे स्पष्टीकरण अभियोगपक्षाने दिलेले नाही. सदर साक्षीदाराने हॅश व्हॅल्यू मोफत सॉफ्टवेअरने काढली असल्याचे सांगितले आहे. सदर सॉफ्टवेअर अधिकृत आहे किंवा नाही हे त्यांना माहित नसल्याचे सांगितले आहे. सदर सॉफ्टवेअरच्या अचूकतेबाबत त्यांना माहित नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. व्हीडीओ मोबाईलमध्ये असतानाची हॅश व्हॅल्यू काढलेली नाही. लॅपटॉपमधील व्हीडीओची हॅश व्हॅल्यू व मोबाईलमध्ये असलेल्या व्हीडीओची हॅश व्हॅल्यू काढून तुलना केली नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे सदर व्हीडीओ हे शंकास्पद वाटते. केवळ सदर व्हीडीओवर विसंबून आरोपींना दोषी ठरविता येणार नाही.

**१८.** जे सरकारी वाहन होते त्याची लॉगबुकची नोंद मिळून आली नसल्याचे साक्षीदार क्र.८ तपासी अंमलदार यांनी सांगितले आहे. चणे, फुटाणे

विकणा–या चार इसमांपैकी ज्या दोन इसमांना पिटर गाडीमध्ये बसवून करंजाडे चौकी येथे आणले होते त्यांची नावे कोणत्याही साक्षीदाराने सांगितलेली नाहीत. तसेच, आरोपी ज्या गाडीतून घटनास्थळी आले त्या गाडीचा नंबर व वर्णन कोणत्याही साक्षीदारांनी सांगितलेली नाहीत. आरोपींसोबत आलेल्या लोकांची नावे कोणत्याही साक्षीदारांनी सांगितलेली नाहीत. एकंदरीत पुराव्याचा विचार करता, आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना शासकीय कर्तव्य पार पाडत असताना अडथळा केला असे अभियोगपक्षाने सिध्द केलेले नाही.

**१९.** आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ३५३ सह कलम ३४ खालील अपराध केल्याचे अभियोगपक्षाने संशयापलिकडे सिध्द केलेले नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ यांचे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे. आरोपी हे निर्दोष मुक्ततेस पात्र आहेत. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| ०१. | आरोपी क्र.**१**–प्रतिक दत्तात्रय जाधव व **२**– सुवर्णा दत्तात्रय जाधव यांना फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २३५(१) नुसार भारतीय दंड विधान कलम ३५३ सह कलम ३४ या गुन्हयांतून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| ०२. | आरोपींचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ०३. | आरोपी यांना असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये ५०,०००/– (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) जातमुचलका व तेवढयाच रकमेचा जामीन द्यावा. |
| ०४. | जप्त मुद्देमाल एक पेनड्राईव्ह हा अभिलेखासोबत ठेवणेत |

| | |
|---|---|
| | यावा. |
| ०५. | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३६५ प्रमाणे सदर न्यायनिर्णयाची एक प्रत जिल्हा दंडाधिकारी, रायगड–अलिबाग यांच्याकडे पाठविण्यात यावी. |
| (सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आला.) | |

SANTOSH RAMU CHAVAN

Digitally signed by SANTOSH RAMU CHAVAN
Date: 2026.04.02 13:48:15 +0530

पनवेल. (एस. आर. चव्हाण)

दिनांक – ०१/०४/२०२६. अतिरिक्त सत्र न्यायाधीश,

पनवेल – रायगड.